# प्रात्यक्षिक क्रमांक – ०१

## शिवणकामास उपयुक्त साधने

चांगले कपडे शिवण्यासाठी विविध प्रकारच्या साधनांची आवश्यकता असते. कपडे शिवताना प्रथम स्वत:ला या साधनांची व त्यांच्या वापराची माहिती असणे आवश्यक असते. त्यामुळे विशिष्ट काम करण्यास कोणते साधन उपयुक्त आहे हे कळते. साधनांच्या उपयोगानुसार त्यांचे पुढील वर्गीकरण करतात.

चित्र नं. १.१ : शिवणाची साधने



मापनाची साधने
मेजरिंग टेप पट्टी
शिंप्याचा काटकोन



शिवण कामास
उपयुक्त साधने



खुणा करण्याची साधने
शिंप्याचा खडू
फ्रेंच कर्व्ह
बेतचाक



कापण्याची साधने
मोठी कात्री
लहान कात्री



शिलाईची साधने
सुई – दोरा
अंगुस्तान



संस्करणाची साधने
दाते असलेली
कात्री

१) **मापनाची साधने :**

अ) **मेझरिंग टेप –** शरीराची मापे घेण्यासाठी व कापड मोजण्यासाठी टेपचा उपयोग करतात. टेपची लांबी ६० फूट किंवा१५२ से. मी. असते. टेप प्लास्टिक किंवा रेक्झिनचा असतो. तो लवचिक असून त्याच्या दोन्ही बाजूंवर खुणा असतात.

ब) **पट्‌टी –** पट्‌टी १२ इंच किंवा ६ इंच लांब असते. ही पट्‌टी लाकडी प्लॅस्टिक किंवा धातूची असते. आणि त्यावर इंच तसेच सेंटिमीटरच्या खुणा असतात.

क) **शिंप्याचा काटकोन (टेलर्स स्क्वेअर) –** इंग्रजी L आकारातील हे साधन लाकडी, प्लॅस्टिक किंवा धातूचे बनवलेले असते. याचा उपयोग समांतर रेषा किंवा काटकोनातील रेषा मोजण्यास व आखण्यास होतो.

२) **खुणा करण्याची साधने :**

अ) **शिंप्याचा खडू (टेलर्स चॉक) –** हा मऊ चपटा व ठिसूळ खडू असतो. मध्यभागात जास्त जाड व कडांना कमी जाडीचा असतो. हे खडू वेगवेगळ्या रंगात व आकारात उपलब्ध असतात. कापडावर खूणा करण्यास याचा उपयोग करतात. या खडूने सहजपणे खुणा करता येतात तसेच सहजपणे पुसल्याही जातात.

ब) **फ्रेंच कर्व्ह –** बेतकाम करताना आकृतीच्या वक्राकार रेषा काढण्यास याचा उपयोग करतात. हे प्लॅस्टिकचे बनवलेले असते आणि लहान-मोठ्या आकारात उपलब्ध असतात.

क) **बेत चाक (ट्रेसिंग व्हील) –** बेतचाकाच्या पुढच्या भागात करवती दाते असलेले स्टीलचे एक चाक असते व त्याला धरण्यासाठी प्लॅस्टिक किंवा लाकडी दांडा बसवलेला असतो. कापडावर शिवणी, गळा, मुंढा, खिसे, चुण्या इत्यादींच्या खुणा उमटवण्यासाठी याचा वापर करतात. कापडावरून किंवा कापडाखाली कार्बन कागद ठेवून उपयोग करतात. बेतचाक वापरून एकाच वेळी कापडाच्या एकापेक्षा जास्त पदरांवर खुणा करता येतात.

ड) **शिवणकामाचे कार्बन पेपर (ड्रेस मेकर्स कार्बन) –** हे कार्बन पेपर लाल, पिवळ्या रंगाचे असतात. या कार्बन पेपरचे कापडावर ठळक डाग पडत नाहीत. ट्रेसिंग व्हील म्हणजेच बेतचाक वापरून कार्बन पेपरच्या मदतीने एकापेक्षा जास्त कापडांच्या थरांवर खुणा करता येतात.

इ) **रंगीत पेन्सिल –** यालाच शिंप्याची पेन्सिल असेही म्हणतात. ही पेन्सिल अर्धी लाल व अर्धी निळी असते. आकृती मधील वेगळे भाग दर्शविण्यासाठी उपयोग करतात. सध्या ही फारशी वापरात आढळत नाही.

फ) **ब्राऊन पेपर–** कापड कापण्यापूर्वी कागदी नमुने तयार करण्यास हा कागद वापरतात.

३) **कापण्याची साधने :**

अ) **मोठी कात्री (सिझर्स) –** हे कापड कापण्यासाठी वापरण्यात येणारे दोन पाती असलेले साधन आहे. याची लांबी ९ ते १२ इंच असते कात्रीच्या टोकाला दोन्ही पात्यांच्या शेवटी कडे किंवा रिंगण असते. त्यापैकी एक वर्तुळाकार असून त्यात अंगठा घालतात. यामुळे कापताना चांगले नियंत्रण राहते. कात्र्या वेगवेगळ्या आकारमानाच्या असतात. त्यांची पाती स्टील किंवा लोखंडी असतात तर मागील कडी प्लॅस्टिक, स्टील किंवा पितळी असतात. कापड कापायची कात्री इतर काहीही कापण्यास वापरू नये. अन्यथा कात्रीची धार जाण्याची शक्यता असते.

ब) **लहान कात्री (सिझर्स) –** हे लहान आकाराचे साधन असून त्यास क्लिप्स असेही म्हणतात. या कात्रीतील पात्यांची लांबी ६ ते ९ इंच असून

ती स्टीलची बनलेली असते. पाठीमागील कडी स्टील किंवा प्लॅस्टिकची असतात. दोन्ही कड्या गोलाकार असून एकामध्ये अंगठा व दुसऱ्यामध्ये तर्जनी (पहिले बोट) घालतात. कागद कापण्यासाठी ही कात्री वापरतात.

## ४) शिलाईची साधने :

**अ) अंगुस्तान –** हे बोटात घालण्याचे टोपण असून हातशिलाई करताना बोटात घातल्याने सुई बोटात टोचत नाही. स्टील, पितळी किंवा प्लॅस्टिक अशा प्रकारांत अंगुस्तान उपलब्ध असते.

**ब) हात शिलाईच्या सुया –** हाताने शिवताना या सुया वापरतात. या विविध आकाराच्या आणि विविध प्रकारच्या पॅकेजमध्ये उपलब्ध असतात. साध्या घरगुती हातशिलाईसाठी ९ नं. सुया वापरतात.

**क) दोरे –** सर्वसाधारण शिलाईसाठी वापरलेल्या दोऱ्यांचा आकार, कापडाचा रंग व चमक यांना अनुरूप असावेत.दोरे १० ते १५० नंबर पर्यंत उपलब्ध असतात. नेहमीच्या शिवणकामासाठी ४० ते५० नंबरचा सुती दोरा वापरतात.

**ड) टाचण्या –** शिवताना कापडाचे विविध तुकडे एकत्र धरण्यासाठी टाचण्या वापरतात त्यामुळे शिवणकाम जलद होते व त्यात चूक होत नाही. नवीन शिकणाऱ्यांनी टाचण्या वापरणे अत्यावश्यकच असते. परंतु कुशल व्यक्तीही कार्यक्षमता वाढवण्यासाठी टाचण्या वापरतात. अणुकुचीदार टोक असलेल्या तलम टाचण्या वापराव्या त्यामुळे कापड खराब होत नाही. खास शिवणासाठी टोकाला मणी असलेल्या टाचण्या उपलब्ध आहेत.

## ५) संस्करणाची साधने :

**अ) दाते असलेली कात्री (पिकींग सिझर्स) –** करवतीप्रमाणे नागमोडी पाती असलेली ही कात्री असून, या कात्रीने कापड कापल्यावर कापड नागमोडी कापले जाते. त्यामुळे शिवणीतील कापडाच्या कडांमधून दोरे निघून येत नाहीत. इतर कात्र्यांपेक्षा ही कात्री जड व महाग असते.

**तक्ता १.१ : शिवणकामाचे दोरे व सुया**

| कापड | सुती दोरा | हातशिलाईच्या सुया | शिवणयंत्राच्या सुया |
|---|---|---|---|
| तलम कापड-सिफॉन, लेस इ. | ८०-१०० | ९-१० | ९ |
| मध्यम वजनाची कापडे, मलमल, वायल इ. | ६०-८० | ८-९ | ११ |
| मध्यम वजनाची कापडे, पॉपलीन, लोकरी, शर्टसाठी | ४०-५० | ६-७ | १४ |
| जड वजनाची कापडे - डेनिम, ड्रिल, खाकी, जाड पडदे, चादरी | ३०-४० | ४-६ | १६-१९ |
| जड विणीचे कापड, उदा. जॅकॉर्ड, कॅनव्हॉस | २०-३० | ३-४ | २१ |

❊ ❊ ❊